संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# देशातील पहिली डिजीटल जनगणना

जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशाचा तितकाच सर्वात मोठा जगातील सर्वाधिक खर्चाचा जनगणनेचा उपक्रम २०२६ पासून सुरू होत आहे. देशाच्या काही भागात तो ऑक्टोबरपासून तो सुरू होईल तर बाकीच्या भागामध्ये २०२७ पासून जनगणनेची अंमलबजावणी सुरू होईल. स्वतंत्र भारताच्या इतिहासातील ही आठवी जनगणना असेल. तर जवळपास १८७६ पासून या जनगणनेचा उपक्रम सुरू झाला तो अखंडपणे सुरू आहे आणि आतापर्यंतची ही सोळावी जनगणना सांगितली जाते. भारताची जनगणना ही अनेक दृष्टींनी महत्त्वपूर्ण ठरते. केवळ देशात किती लोकसंख्या आहे. एवढ्यापुरतीच ती मर्यादित राहात नाही तर सर्वसामान्य माणसाच्या राहाणीमानापासून ते उत्पन्नाच्या विविधी स्त्रोतांचा अभ्यास त्यातून होतो. प्रत्येक व्यक्तीची आर्थिक स्थिती, सामाजिक स्थितीशिवाय देशातील जीवनमानाचा स्तर, सांस्कृतिक मूल्यमापन हे या जनगणनेच्या माध्यमातून होत असते. यावेळच्या जनगणनेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे आजच्या या तंत्रज्ञानाच्या युगात आणि भारतासारख्या विकसनशील देशातील ही पहिली डिजीटल जनगणना असेल. साधारणपणे मोबाईलच्या माध्यमातून आणि त्यासाठी तयार करण्यात आलेल्या विविध ॲप्सच्या माध्यमातून ही जनगणना अधिकाधिक वेगाने आणि अधिकाधिक काटेकोरपणे करण्याचा प्रयत्न होणार आहे. डिजीटल असल्याने त्यातील अनेक प्रश्नांची उत्तरे ही कमी वेळामध्ये अधिक परिणामकारकपणे गोळा करता येऊ शकतील. यातून देशातील जातीय समिकरणांपासून ते आर्थिक उतन्न गटातल्या विविध लोकांच्या रोजगारासंबंधीसुद्धा माहिती सहजपणे गोळा होऊ शकेल. डिजीटल जनगणना करण्यामागचा आणखी एक उद्देश म्हणजे गेल्या दहा वर्षात जगातले सर्वाधिक डिजीटल व्यवहार हे भारतात झाल्याचे आढळून आले आहे. म्हणजेच भारतातील एकूण लोकसंख्येपैकी जवळपास ८० ते ८५ टक्के लोकांना आता डिजीटल व्यवहाराची कल्पना आलेली आहे. याशिवाय भारतामध्ये युवकांचे सर्वाधिक प्रमाण आहे आणि या युवकांकडून होणारा तंत्रज्ञानाचा वापर, प्रत्येकाकडे असलेले मोबाईल्स आणि या सर्वांकडून होणाऱ्या डीजीटल आर्थिक व्यवहाराची टक्केवारीसुद्धा यानिमित्ताने संकलित होईल.

### भारतातील वाढती लोकसंख्या

यावेळची जनगणना ही स्वतंत्र भारताच्या इतिहासातली अधिक प्रागतिक आणि तंत्रज्ञानयुक्त जनगणना असेल यासाठी कधी नव्हे तो असा सर्वाधिक खर्चही होणार आहे. जवळपास चौदा ते पंधरा हजार कोटींचा खर्च यासाठी अपेक्षित धरला गेला आहे. खरे तर २०१७ किंवा १९ मध्येच ही जनगणना करणे अपेक्षित होते. परंतु कोविडच्या महामारीमुळे ती होऊ शकली नाही. त्यावेळी त्याचा खर्च ९ हजार कोटी रुपये गृहित धरला गेला होता. परंतु गेल्या सहा सात वर्षात लोकसंख्येतील वाढ आणि शिवाय डिजीटल स्वरूपात ही जनगणना करायची असल्याने त्याचा खर्चही वाढलेला आहे. विशेष म्हणजे जवळपास १४० कोटी लोकांची जनगणना करण्याकरीता तितकाच मोठा कर्मचारी वर्ग लागणार आहे. आता प्राथमिक स्तरावर पस्तीस लाख कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. जे केवळ जनगणनेसाठीच पूर्ण वर्षभर तैनात केलेले असतील. म्हणजे या सगळ्या कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाचा त्यांच्या सोयीसुविधांचा आणि त्यांच्यासाठी दिले जाणारे मानधन या सगळ्यांचा खर्च दुप्पट झाला आहे आणि तो आता चौदा हजार कोटींपर्यंत जाऊन पोहचला आहे. खर्चापेक्षाही एवढ्या मोठ्या देशाची जनगणना अधिक परिणामकारक आणि सर्वसमावेशक होण्याच्यादृष्टीने या खर्चाची तितकीच आवश्यकता आहे. परंतु सर्वात लक्षात घेण्यासारखी बाब अशी आहे की, भारताने गेल्या पंधरा वर्षामध्ये विविध स्तरावर प्रगती केली आहे. अगदी खेड्यापाड्यापर्यंत पोहचलेल्या इंटरनेट सेवेपर्यंत त्याची परिणामकारकता तपासणे या जनगणनेतून शक्य होणार आहे. विशेषतः रोजगाराचा प्रश्न अनेकदा गांभिर्याने मांडला जात असतो. आणि देशात मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी आहे हेसुद्धा सांगितले जात असते. या जनगणनेतून बेरोजगारांची नेमकी संख्या किती आहे आणि त्यात स्वयंरोजगार करणारे किंवा तंत्रज्ञानाच्या माध्यमातून स्टार्टअपसारखे उद्योग उभारणाऱ्यांची संख्या स्वतंत्रपणे नोंदली जाऊ शकते. भारताची विविधता लक्षात घेऊन जात पंथ, संप्रदाय, धर्म याची तर मोजणी होईलच. त्याचे मापदंड आणखी वेगळे असू शकते.

### खेड्यापाड्यापर्यंत तंत्रज्ञान

यानिमित्ताने भारतात जातींची संख्या किती आहे त्यांना मिळालेल्या सवलती कशी स्वरूपाच्या आहेत. किती प्रकारच्या भाषा बोलल्या जातात याचादेखील तुलनात्मक अभ्यास उपलब्ध होईल. २०११ साली झालेल्या जनगणनेतून भारताची लोकसंख्या १२१ कोटी असल्याचे नोंदले गेले होते. परंतु यावेळची लोकसंख्या १४५ कोटीपर्यंत जाण्याची शक्यता व्यक्त झालेली आहे. म्हणजे वाढत्या लोकसंख्येचा विचार करून जनगणनेची व्यवस्था भक्कम ठेवावी लागणार आहे. यातील सर्वात कसोटीचा भाग मोठ्या महानगरांमध्ये किंवा अतिशय छोट्या गावांमध्ये अनेकांना स्वतःची घरे नसतात. जे पदपथांवर किंवा झोपडपट्टीत राहातात. जे भटके विमुक्त असतात. त्यांचाही शोध घेऊन नोंदणी करावी लागते. आणि पुनरावृत्ती होणार नाही याचीदेखील काळजी घ्यावी लागते. म्हणूनच या जनगणनेचे नियोजन जितके काटेकोर होईल. तितकाच त्यातून येणारा निष्कर्ष हा अधिक चांगला होऊ शकेल. नीतीआयोगासारख्या संस्था तयार करताना पंचवार्षिक योजना तयार करताना जनगणनेती,विविध पैलूंचा खूप उपयोग होतो. एकूणच देशाची भविष्यकालीन ध्येयधोरणे ठरवण्याकरीता ही माहिती मवत्त्वपूर्ण ठरते. देशातील ही पहिली डिजीटल जनगणना अनेक अर्थाने दिशादर्शक ठरू शकेल. जागतिक स्तरावर भारताने केलेली तंत्रज्ञानातील प्रगती आणि युवकांची सर्वाधिक संख्या या दोन्ही दृष्टींनी जनगणनेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कालोचितच म्हणावा लागतो. प्रत्येक राज्यामध्ये त्याचा होणारा प्रचार, प्रसार आणि खेड्यापाड्यापर्यंत यानिमित्ताने पोहचवण्याचे तंत्रज्ञानसुद्धा या जनगणनेची एक मोठी उपलब्धी ठरू शकते.